# मजरूह सुलतानपुरी - भाग १



वो जो मिलते थे कभी हमसे दिवानों की तरह,
आज यूँ मिलते है जैसे कभी पहचान न थी

तुम्ही जर शेक्सपियर किंवा गालिब यांचे वाङ्मय वाचून त्यांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेच्या प्रभावाने अचंबित झाला असाल तर आता मी तुम्हाला आणखी एका उदंड प्रतिभासंपन्न दिग्गजाच्या म्हणजेच मजरुह सुलतानपुरी यांच्या जगात घेऊन जाणार आहे. त्यांच्या असामान्य योगदानामुळे त्यांची कामगिरी 70mm स्क्रीनप्रमाणे अतिभव्य झाली आहे. पृथ्वीतलावरील कुठल्याही विषयावर त्यांनी इतके अमाप आणि इतके सुंदर लिखाण केले आहे की काही विचारूच नका ! आयुष्यातील चढउतारांचे त्यांना इतक्या समर्पक शब्दांत केलेले वर्णन वाचून तुम्ही थक्क व्हाल. त्यामुळे हिंदी चित्रपटांसाठीचा १९९३ सालचा 'दादासाहेब फाळके' पुरस्कार हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च बहुमान त्यांना मिळाला ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.

हम है माता-ए-कूचा-ओ-बाजार की तरह
उठी है हर निगाह खरीदार की तरह

वरील काव्यपंक्ती लिहिणारे कवी मजरूह यांचा जन्म उत्तर प्रदेशातील निजामाबाद येथे १ ऑक्टोबर १९१९ रोजी झाला. त्यांचे खरे नाव असरार हसन खान असे होते. त्यांचे वडील पोलीस कॉन्स्टेबल होते

व आपल्या मुलाने धार्मिक शिक्षण घ्यावे असे त्यांना वाटे. त्यांचे प्राथमिक शिक्षण अरबी, उर्दू आणि पर्शियन भाषेत झाले. फैजबाद येथील दर्स-ए-निझामिया नावाच्या प्रशिक्षणासाठी ह्या छोट्याला पाठवण्यात आले. परंतु तो त्यात रमला नाही आणि शिक्षण अर्धवटच राहिले. नंतर त्याऐवजी युनानी औषधविषयक कोर्स (तिबिया) जो अरबी भाषेत होता तेथे त्याला दाखल करण्यात आले. हा कोर्स मात्र त्यांनी पूर्ण केला. १९३८ साली त्यांनी एक वर्ष हकीम म्हणून काम केले. परंतु भाषांवरील प्रेम त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते त्यामुळे रुग्णाना औषध देण्यापेक्षा काव्यातच त्यांचे मन अधिक रमू लागले आणि त्याची फलश्रुती म्हणजे ते मुशाहिऱ्यांना हजेरी लावू लागले. ते प्रेक्षकांत सर्वांत आधी येऊन बसत आणि नंतर हळूहळू त्यांना स्टेजवर स्वरचित शेरोशायरीसाठी सन्मानाने बोलावण्यात येऊ लागले.

१९४१ साली त्यांची सुप्रसिध्द शायर जिगर मुरादाबादी यांच्याशी भेट झाली आणि त्यांनी त्यांना आपले उस्ताद मानले. १९४५ साली जिगर हे या युवकाला - म्हणजे असरारला मुंबईला घेऊन आले. (आता त्याचे नाव असरार न राहता मजरुह म्हणजेच दुखावलेला किंवा व्यथित असे झाले होते.) येथेच एका मुशायऱ्यात ए. आर. करदार यांनी या भावूक कवीचे गीत ऐकले आणि काहीही प्रसिध्दीचे वलय नसलेल्या या युवकाला 'शहाजहान' चित्रपटातील दहापैकी सात गीते लिहिण्याची संधी मिळाली. ह्यांचा चित्रपटातील प्रवास असा नाट्यमय रितीने झाला.

रहे ना रहे हम महेका करेंगे
बनके कली, बनके सबा, बाग-ए-वफा मे

चित्रपट जगतात संधी मिळाल्यानंतर कारकिर्दीतील अनेक अडथळ्यांवर मात करीत व आपला वाङ्मयीन व्यासंग सुरूच ठेवत मजरूह सुलतानपुरी हे एक अव्वल दर्जाचे गीतकार म्हणून यशस्वी झाले. त्यांनी शेकडो चित्रपट केले आणि संगीतकार, गायक, चित्रपट निर्माते आणि रसिक श्रोते यांच्या तीन पिढ्यांसाठी हजारो गीते लिहिली. लेखक आणि अक्वी अली सरदार जाफरी यांच्या मते अखिल जगातील मानवाच्या प्रतिष्ठा आणि सन्मानासाठी झगडणाऱ्या आणि गाणाऱ्या समविचारी कवींचे मजरूह हे प्रतिनिधीत्त्व करतात.

मजरूह म्हणजेच 'व्यथित' हे सहजासहजी दुखावले जात असत. त्यांना असभ्यपणा मुळीच खपत नसे. ते एका प्रतिष्ठित 'इखलाखी' पार्श्वभूमीतून आल्यामुळे त्यांना दुसऱ्यांचा आदर राखणे आणि दुसऱ्यांकडून आदर मिळणे अपेक्षित असे. परंतु नेहमी असे घडेलच असे सांगता येत नाही. शक्य असेल तेव्हा ते दुर्लक्ष करीत पण काही बाबतीत असे करता येत नसे. एकदा महाराष्ट्र राज्याच्या एका मुख्यमंत्र्यांनी स्टेजवर त्यांच्याशी उभे राहून हस्तांदोलन केले नाही त्यामुळे त्यांचा अपमान झाला आणि त्यांनी तो वादाचा विषय केला. त्यांचे सर्व लिखाण साधनशुचितेला धरून असे. पालक आपल्या

मुलांसमवेत ऐकू शकणार नाही असे असभ्य लिखाण त्यांनी कधीच केले नाही. त्यामुळे लोकांनी उचलून धरलेले 'आती क्या खंडाला?' हे गाणे ऐकून ते खूप चिडले होते. त्यांनी आपल्या ठराविक पध्दतीने त्या गाण्याचा खरपूस समाचारही घेतला. ते एवढे प्रक्षुब्ध होतील असे वाटले नव्हते. एकदा 'फिल्मफेअर'बाबतीत त्यांचे असेच झाले. ही मुलाखत सुरू असताना 'फिल्मफेअर'च्या लेखकाचा फोन आला. त्यांना मजरूह यांचे 'फोटो शूट' करायचए होते. त्यावर उखडून ते म्हणाले, 'कोण ? 'फिल्मफेअर' ? काय असतं ते ?' त्यानंतर ते आवाज कमी करून म्हणाले, 'बेटी, मी ह्या चित्रपटसृष्टीत तुझ्या किंवा अगदी 'फिल्मफेअर'च्याही आधीपासून आहे, त्यामुळे फोटोशिवाय मला तुम्ही ओळखत नसाल तर मीही तुम्हाला ओळखत नाही. आणि त्यांनी सहजपणे परंतु निग्रहाने ती विनंती फेटाळून लावली.

परंतु ते उठसूट हळवे होणाऱ्यांपैकी नव्हते. एखादा कलाकार जेवढा संवेदनशील असतो तेवढेच ते होते. काही वेळा ते बऱ्याच बाबतीत दुर्लक्ष करीत. उदाहरणार्थ '100 Luminaries of Indian Cinema' नावाचे एक पुस्तक प्रकाशित झाले होते. त्यात त्यांचा उल्लेखही नव्हता. एवढेच नव्हे, तर शकील आणि काही आदरणीय व्यक्तींचाही त्यात समावेश नव्हता. परंतु काही अतिसामान्य लोकांची त्यात नावे होती. ती कुणाच्याही पसंतीस उतरली नव्हती. ठळकपणे जाणवलेल्या अनुल्लेखाबद्दल विचारले असता मजरूह यांनी हसून पुढील ओळींतून तो उडवून लावला.

उठाये जा उनके सितम, और जिये जा
यूँही मुस्कराये जा, आँसू पिये जा

तसेच पत्नी, नौगुल, नौबहार आणि सबा (दिग्गज संगीतकार नौशाद यांच्या राजू नावाच्या मुलाबरोबर हिचे लग्न झाले होते) अशा तीन कन्या आणि अंदलिब व पै. एराम असे दोन मुलगे असे मजरुह यांचे कुटुंब होते. मुंबईच्या लीलावती हॉस्पिटलमध्ये २४ मे २००० रोजी मजरूह सुलतानपुरी पैगंबरवासी झाले.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories”

is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015.
To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com